# प्रेस नोट

# रबाळे MIDC पोलीस ठाणे, नवी मुंबई,

## घरमालकाचे सोन्याचे दागीने चोरी करून पलायन करणा–या पेईंग गेस्ट महीलेस १२ तासाच्या आत अटक

प्रकरणाची हकिगत –

यातील फिर्यादी महीला व आरोपीत महीला यांचे मागील एक महिन्यापासुन ओळख झाली होती तेव्हापासुन फिर्यादी यांनी आरोपीत महीला हिला पेंइग गेस्ट म्हणुन घरी रहावयास ठेवले होते. फिर्यादी महीला हया दिनांक १२/०२/२०२१ रोजी ते दिनांक ०२/०३/२०२१ रोजी त्याचे मुळ गावी गेले असताना यातील आरोपीत महीला हीने फिर्यादी यांचे घरातील ०७,८४,००० रूपये किमंतीचे वेगवेगळया प्रकारचे सोन्याचे धातुचे दागिने व रोख रक्कम ०५,०००/– रूपये चोरी केले अशी फिर्यादी यांनी दिलेल्या तकारीवरून रबाळे MIDC पोलीस ठाणेस गु.र.क्र. ६१/२०२१ कलम ३८० भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करून तपास सुरू करण्यात आला.

तपासाचा वृतांत –

सदर प्रकरणाचे गांभीर्य ओळखुन मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ १, वाशी, यांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन केल्याप्रमाणे पाठपुरावा करून व मा. सहायक पोलीस आयुक्त, वाशी विभाग व श्री. नितीन गिते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. रामचंद्र घाडगे यांच्या अधिनस्त गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.पो.नि. यशवंत पाटील व गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार यांचे पथक तयार करण्यात आले. यातील पाहीजे महीला आरोपीत हीचा तांत्रिक तपासाद्वारे शोध घेउन तिला चिंचपाडा, ऐरोली परीसरातुन पलायन करीत असताना ताब्यात घेउन तिच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता तिने तिचे नाव **सिध्दी ( उर्फ स्वाती ) नरेंद्रकुमार वैदय, उर्फ सारा समीर सय्यद वय ३२ वर्षे राह. रूम नं ४७२, बी वार्ड, इंगळे गल्ली, रविवार पेठ, कोल्हापुर,** असे असल्याचे सांगितले. आरोपीत महीला ही फिर्यादी यांचे घरी पेंइग गेस्ट म्हणुन मागील एक महीन्यापासुन राहत होती. दिनांक १२/०२/२०२१ रोजी फिर्यादी हया त्यांचे कुटुबियासोबत त्याचे मुळ गावी कोल्हापुर येथे गेल्या होत्या, जाताना त्यांनी घराची चावी ही आरोपीत महीला यांचेकडे ठेवुन दिली होती. त्या गोष्टीचा फायदा घेउन आरोपीत महीला हीने फिर्यादी यांचे घरातील १७.३ तोळे सोन्याचे दाग दागीने व रोख रक्कम ५०००/– असे **एकुण ७,८४,०००/– रूपये** किमंतीचा ऐवज चोरी केला होता. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान सदर आरोपीत महीलेकडुन १४.८ तोळे सोन्याचे दागीने व ७०० रूपये रोख रक्कम असे **एकुण ६,६७,२००/–** रूपये किमतींची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. सदर महीला आरोपीस दिनांक ०३/०३२०२१ रोजी १७:३४ वा अटक करण्यात आली असुन पोलीस कस्टडी रिमांड दिनांक ०६/०३/२०२१ रोजीपर्यत घेण्यात आली.

**आरोपीचे नाव व पत्ता – सिध्दी ( उर्फ स्वाती ) नरेंद्रकुमार वैद्य, उर्फ सारा समीर सय्यद वय ३२ वर्षे राह. रूम नं ४७२, बी वार्ड, इंगळे गल्ली, रविवार पेठ, कोल्हापुर.,**

**हस्तगत मालमत्ता – एकुण ६,६७,२००/– रूपये किमंतीची मालमत्ता**

तपास पथक –

सदर गुन्ह्याचा तपास मा. श्री. बिपीनकुमार सिंह, पोलीस आयुक्त, मा. डॉ. जय जाधव, पोलीस सह आयुक्त, मा. श्री. सुरेश मेंगडे, पोलीस उपायुक्त, परीमंडळ १, वाशी, मा. श्री. विनायक वस्त, सहायक पोलीस आयुक्त, वाशी विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्री. नितीन गीते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. रामचंद्र घाडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांच्या अधिपत्याखाली सदर गुन्हा उघडकीस आणणेकामी श्री. यशवंत पाटील, स.पो.नि., पो.हवा.क्र. ५०७/विश्वास काजरोळकर, पो.ना.क्र. २८५०/अनिल मोटे, पो.ना.क्र. २१४०/वैभव पोळ, पो.ना.क्र. १८५७/शिवाजी बाबर, पो.शि.क्र. ३१८७/संतोष काकड, यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.